**पत्र** जा.क्र.कृआआ/एनएमएसए/आरएडी/मासु/१५०/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक : २५ ऑगस्ट, २०१६.

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**विषय** : राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) सन २०१६-१७ अंतर्गत वैयक्तिक शेततळे या बाबीकरीता सुधारित मार्गदर्शक सूचना.....

**संदर्भ :** १. कृषि आयुक्तालायाचे पत्र जा.क्र.कृआआ/एनएमएसए/आरएडी/मासु/१३९/२०१६ दिनांक : १ ऑगस्ट, २०१६
२. शासन निर्णय क्रमांक शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५ दि.१७ फेब्रुवारी २०१६.
३. शासन निर्णय क्रमांक जलसं-२०१६/प्र.क्र.४८/जल-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.११ मार्च, २०१६.
४. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे-१ यांचेकडील (अ) पत्र जा.क्र.मृदसं/शेततळे कक्ष/मृद-४/४१७/१६ दि.२२/०२/२०१६. (ब) पत्र जा.क्र.मृदसं/मृद-४/शेततळे/अनुदान वितरण-कार्यपध्दती/७४६/२०१६ दि.३१.३.१६ (क) पत्र जा.क्र.मृदसं/शेततळे कक्ष/मा.सु./१५९०/२०१६ दि.२१/६/१६.
५. कृषि व सहकार विभाग , भारत सरकार No.1-7/2014-RFS-III/Govt. of India, Ministry of Agriculture & Farmers Welfare dtd. 20th June 2016.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये, कृषि आयुक्तालायाकडून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या योजनेच्या सन २०१६-१७ मधील अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. **९.२.४.१ वैयक्तिक शेततळे** या बाबीकरीता संदर्भ क्र.२ व ३ वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने, तसेच संदर्भ क्र.४ वरील पत्रानुसार, शेततळे या उपचाराच्या कामामध्ये एकवाक्यता राखण्याच्या दृष्टीने विविध योजनेतील शेततळ्यासाठी एकच कार्यपध्दती अवलंबविण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार, खालीलप्रमाणे सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**वैयक्तिक शेततळे :-**

१. पाण्याचे स्त्रोत निर्माण करणे व साठवलेले पाणी झिरपून वाया जाऊ नये आणि पाणी टंचाईच्या काळात साठवलेल्या पाण्याचा उपयोग व्हावा यासाठी निवडलेल्या गांवात शेततळे खोदकाम व अस्तरीकरण करण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

२. या घटकांतर्गत वैयक्तिक शेततळ्यांचा लाभ शेतक-यांना देता येऊ शकतो. शेततळे बांधणीचा (खोदकाम व अस्तरीकरण) दर रू.१२५/- प्रति घ.मी. मैदानी प्रदेशासाठी व रू.१५०/- प्रति घ.मी. डोंगराळ प्रदेशासाठी निश्चित करण्यात आला आहे.

३. शेततळ्याच्या आकारमानाच्या प्रमाणात (Prorata basis) वैयक्तिक शेततळ्यासाठी ५०% अनुदान देय राहील. तथापि, जास्तीत जास्त अनुदान रू.७५,०००/- प्रति लाभार्थी ( मैदानी प्रदेश) व रू.९०,०००/- प्रति लाभार्थी (डोंगराळ प्रदेश) देता येईल.

४. उपरोक्तप्रमाणे नमूद केलेले खर्चाचे मापदंड हे खोदकाम व अस्तरीकरण यांच्या एकत्रित खर्चाकरीता आहेत. तथापि, लभार्थ्यांनी निव्वळ खोदकाम केलेल्या शेततळ्याकरीता मागणी केल्यास, वरीलप्रमाणे खर्चाच्या मापदंडाच्या ३० टक्के कमी मापदंड निश्चित करण्यात यावेत.

५. विविध आकारमानाच्या तसेच अस्तरीकरणाविरहित व अस्तरीकरणासह शेततळ्यांसाठी आर्थिक मापदंड व जास्तीत जास्त देय अनुदान खालीलप्रमाणे :-

## वैयक्तिक शेततळे या बाबीकरीता मापदंड व अनुदानाचा तपशील

### इनलेट-आउटलेटसह शेततळे ( अस्तरीकरणाविरहित )

| अ. क्र. | वैयक्तिक शेततळ्याचे मॉडेल आकारमान (मी) | प्रत्यक्ष खोदकामाचे प्रमाण (घ.मी.) | वैयक्तिक शेततळ्यासाठी येणारा खर्च अस्तरीकरणाविरहित (रू.) | | अनुज्ञेय अनुदान (रू.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मैदानी प्रदेशासाठी रू.८७.५०/-प्रति घ.मी. | डोंगराळ प्रदेशासाठी रू.१०५/-प्रति घ.मी. | मैदानी प्रदेश | डोंगराळ प्रदेश |
| १ | १५x१५x३ मी. | ४४१ | ३८५८७.५ | ४६३०५ | १९२९४ | २३१५३ |
| २ | २०x१५x३ मी. | ६२१ | ५४३३७.५ | ६५२०५ | २७१६९ | ३२६०३ |
| ३ | २०x२०x३ मी. | ८७६ | ७६६५० | ९१९८० | ३८३२५ | ४५९९० |
| ४ | २५x२०x३ मी. | ११३१ | ९८९६२.५ | ११८७५५ | ४९४८१ | ५०००० |
| ५ | २५x२५x३ मी. | १४६१ | १२७८३७.५ | १५३४०५ | ५०००० | ५०००० |
| ६ | ३०x२५x३ मी. | १७९१ | १५६७१२.५ | १८८०५५ | ५०००० | ५०००० |
| ७ | ३०x३०x३ मी. | २१९६ | १९२१५० | २३०५८० | ५०००० | ५०००० |

### अस्तरीकरणासह शेततळे ( इनलेट-आउटलेट विरहित )

| अ. क्र. | वैयक्तिक शेततळ्याचे मॉडेल आकारमान (मी) | प्रत्यक्ष खोदकामाचे प्रमाण (घ.मी.) | वैयक्तिक शेततळ्यासाठी येणारा खर्च अस्तरीकरणासहित (रू.) | | अनुज्ञेय अनुदान (रू.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मैदानी प्रदेशासाठी रू.१२५/-प्रति घ.मी. | डोंगराळ प्रदेशासाठी रू.१५०/-प्रति घ.मी. | मैदानी प्रदेश | डोंगराळ प्रदेश |
| १ | २०x१५x३ मी. | ६२१ | ७७६२५ | ९३१५० | ३८८१२ | ४६५७५ |
| २ | २०x२०x३ मी. | ८७६ | १०९५०० | १३१४०० | ५४७५० | ६५७०० |
| ३ | २५x२०x३ मी. | ११३१ | १४१३७५ | १६९६५० | ७०६८७ | ८४८२५ |
| ४ | २५x२५x३ मी. | १४६१ | १८२६२५ | २१९१५० | ७५००० | ९०००० |
| ५ | ३०x२५x३ मी. | १७९१ | २२३८७५ | २६८६५० | ७५००० | ९०००० |
| ६ | ३०x३०x३ मी. | २१९६ | २७४५०० | ३२९४०० | ७५००० | ९०००० |

**टीप : शेततळे या उपचाराच्या कामामध्ये एकवाक्यता राखण्याच्या दृष्टीने "मागेल त्या शेततळे" या योजनेंतर्गत शेततळे खोदकामासाठी देय असलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान कोणत्याही परिस्थितीत देय होणार नाही, याची नोंद घ्यावी.**

केंद्र शासनाच्या उपरोक्त संदर्भाधिन पत्र क्र.५ मध्ये निर्देशित केलेनुसार कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या प्रकल्प क्षेत्रामध्ये जलसंवर्धन अंतर्गत समाविष्ट असलेल्या बाबी उदा. सामुहिक जलसाठा साधने, वैयक्तिक शेततळे राबवावयाच्या असतील तर त्यासाठी प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY) या योजनेतून निधी उपलब्ध करून घ्यावा. तथापि, मर्यादित प्रमाणात जलसंवर्धनाच्या बाबी कोरडवाहू क्षेत्र विकास या योजनेतून राबविता येतील. त्यासाठी सदर बाबी जिल्ह्याच्या, जिल्हा सिंचन आराखड्यामध्ये (DIP) प्रस्तावित करण्यात आलेल्या बाबींमधून घेण्यात याव्यात. सदर बाबींचा समावेश प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या (PMKSY) वार्षिक कृती आराखड्यामध्ये करण्यात यावा व त्यामध्ये कोरडवाहू क्षेत्र विकास या योजनेतून निधी उपलब्ध करून घेतल्याबाबत स्पष्ट उल्लेख करावा व त्यास PMKSY साठी गठित केलेल्या राज्यस्तरीय समितीची (SLC) मान्यता घेण्यात यावी. सदर बाबींचा प्रगती अहवाल PMKSY योजनेच्या पोर्टलवर देखील भरण्यात यावा.

उपरोक्तप्रमाणे सुधारित मार्गदर्शक सूचना आपले अधिनस्त सर्व कार्यालयांना परिपत्रित करण्यात याव्यात. त्यानुसार कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

**सोबत :** वरील प्रमाणे

**स्वाक्षरित/-**
**( कृ.वि.देशमुख )**
**कृषि संचालक (वि व प्र)**
कृषि आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.